अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १७५ ■ गुरूवार दि.१३ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 175 ■ Thursday Dt. 13 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4




# बोधगया मंदिर अधिनियम १९४९ रद्द करण्यासाठी आंदोलन

## वंचितचे चोख नियोजन भारतीय बौद्ध महासभेचे नेतृत्व

बीड । प्रतिनिधी

सम्राट अशोक यांनी इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात महाबोधी महाविहाराचे बांधकाम केले. तथागत बुद्धाला ज्या बोधीवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली तो बोधीवृक्ष याच महाबोधी महाविहार परिसरात आहे. त्यामुळे देशातील नव्हे, तर जगभरातील बौद्ध अनुयायी भिक्खू आणि पर्यटक या स्थळाला भेट देतात मात्र या महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन आजही बौद्धांच्या ताब्यात नाही. महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, यासाठी १९९२पासून आंदोलन होत आहेत. तरी सुद्धा महाबोधी विहार व्यवस्थापन कायदा बदलण्यात आला नाही. त्यामुळे पाच हिंदू धर्मीय ह्यांचे प्राबल्य असल्याने बौध्द गया येथील महाविहार येथे पंडे आणि ब्राम्हणवादी पुजा आणि कर्मकांड करीत असतात. त्यामुळे ज्या रूढी परंपरा ह्यांना तथागत गौतम बुद्ध ह्यांनी नाकारले तीच कर्मकांड येथे सुरू आहेत.

जागतिक वारसा म्हणून मान्यता प्राप्त बौध्द गया येथील महाविहार व्यवस्थापन कायदा तातडीने बदलण्यात यावा अशी आमची मागणी आहे. याकरीता सदर आंदोलन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू ड. प्रकाश आंबेडकर तथा




बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शन व आवाहनानुसार तसेच भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भिमराव आंबेडकर यांच्या पुढाकाराने तसेच समता सैनिक दल व विविध बौद्ध संघटना यांच्यावतीने आज दि. १२ मार्च २०२५ रोजी देशभरातील बौद्धांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भारतीय बौद्ध महासभा व वंचित बहुजन आघाडीच्यावतीने संयुक्तरित्या आंदोलन करीत आहोत.

महाबोधी महाविहार (बोधगया, बिहार) हे पवित्र बौद्ध धर्मस्थळ असून, बोधगया महाविहार कायदा १९४९ चा अन्यायकारक कायदा रद्द करावा. बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय बौद्धांना सोबत घेऊन बौद्धांच्या ताब्यात द्यावे. जागतिक वारसा अबाधित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात विशेष विकास निधी आणि सुविधा तात्काळ देण्यात याव्यात. आपला देश स्वातंत्र्य झाल्यावर २६ जानेवारी १९५० पासून घटना लागू झाली आहे. त्यावेळी भारतीय राज्यघटनेचे कलम १३ नुसार घटना लागू होण्यापूर्वी केलेले सर्व कायदे आणि नियम निरस्त केले आहेत. मात्र तरी देखील देशात १९४९ चा नियमबाह्य कायदा लावून बौध्द समूहाचे धार्मिक अधिकार काढून घेण्यात आले आहेत.


आपण देशाच्या प्रमुख आहात, याकरीता केंद्र सरकार आणि बिहार सरकारने आपले विशेष अधिकार वापरून १९४९ चा कायदा दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात यावा यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे पूर्ण टीम, समता सैनिक दलाचे कॅप्टन आठवले, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, युवक अध्यक्ष आनुरथ वीर, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष अनिताताई चक्रे, अर्जुन जंवजाळ, पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर, राजाभाऊ महुवाले, सचिन मेघदंबर, प्रेम कांबळे, मिलिंद सरपते, दिलीप माने, बाळासाहेब गायकवाड, श्रीकांत वाघमारे, किरण वाघमारे, देविदास वाघमारे, संदीप जाधव, भीमराव पायाळ, भीमराव अवसरमल, आकाश साबळे, बनसोडे पीव्ही, सरवदे केके, विष्णू देवकते, संदीप रोकडे, राजेंद्र पोकळे, पप्पू गायकवाड, सुधीर मिसळे, गौतम चोपडे, भारत तांगडे, राजेश कुमार जोगदंड, लखन जोगदंड, भोले गुलाब, पुष्पाताई तुरुकमाने, अरुणाताई निसर्गंध, सुजाता वासनिक, प्रतिभा वाघमारे, नंदा भंडारे, यांच्या सह असंख्य समाज बांधव उपस्थित होता.

# गेवराई आगाराला नव्या दहा बस मिळणार

## आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीला यश

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई आगाराला डिझेलवर चालणाऱ्या बस उपलब्ध करून



द्याव्यात, बसस्थानकात बीओटी तत्वावर व्यापारी संकुलाचे बांधकाम करावे, गेवराई आगाराची पुनर्बांधणी करून आगारातील वाहनतळाचे काँक्रीटीकरण करावे, अशा मागण्या आमदार विजयसिंह पंडित यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केल्या होत्या. याप्रसंगी दहा नवीन बस तातडीने उपलब्ध करून देण्याची ग्वाही मंत्री सरनाईक यांनी केली.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या गेवराई आगारात मागील अनेक वर्षांपासून अपुऱ्या बसेसमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत होता. या आगारातून ई-बसेस (शिवशाही) सुरु करण्यासाठी सध्या काही तांत्रिक अडचणी येत आहेत. प्रवाशांना सुविधा मिळावी, यासाठी तातडीने डिझेलवर चालणाऱ्या बस उपलब्ध करण्याची मागणी आमदार विजयसिंह पंडित यांनी परिवहन मंत्र्यांकडे केली. त्यांनी दहा नवीन बस तातडीने उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिली. मुख्य प्रशासकीय इमारत, कार्यशाळा, चालक-वाहक विश्रांती कक्ष, महिला कर्मचारी विश्रांती कक्ष, लेखा शाखा, इंधन शाखा, तिकिट शाखा, पाण्याची व्यवस्था आदी अस्थापनांच्या इमारती जिर्ण आणि धोकादायक झालेल्या आहेत. आगारातील वाहनतळाची मोठी दुरावस्था झाली आहे. त्यामुळे या सर्वांची पुर्नबांधणी करण्यासाठी २५ कोटी रुपये निधी उपलब्ध करून बांधकामास मंजुरी देण्याची मागणी आमदार विजयसिंह पंडित यांनी परिवहन मंत्र्यांकडे केली.

याबाबत त्यांनी संबंधितास तपासून कार्यवाहीच्या सूचना दिलेल्या आहेत. स्वारगेट येथील घटनेच्या पार्श्वभुमीवर गेवराई बसस्थानकातील विद्युत दिवे, पंखे यासह इतर सुरक्षाविषयक बाबींसंदर्भात चर्चा करण्यात आली.




# योगतज्ञ श्रीमती राधा तांबे यांना सेवा रत्न पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या जागतिक महिला दिनानिमित्त दिला जाणारा पद्मश्री सिंधुताई सपकाळ सेवा रत्न पुरस्कार सोहळा पार पडला. विविध क्षेत्रात अलौकिक कामगिरी करणाऱ्या नारीशक्तीला दरवर्षी सेवा रत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. योग व निसर्गोपचार तज्ञ (उपचारात्मक योगा)आहार तज्ञ या क्षेत्रामध्ये अतिशय गौरव पूर्ण कामगिरी करणाऱ्या श्रीमती डॉ.राधा तांबे यांचा देखील यानिमित्ताने सेवा रत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. नुकताच अंबड येथे झालेल्या प्रादेशिक मारवाडी युवा मंच तर्फे देखील जागतिक महिला दिनानिमित्त श्रीमती तांबे यांना नारी रत्न पुरस्काराने सन्मानित केले गेले. त्यानंतर त्यांना बीड जिल्ह्यातला नामांकित सेवा रत्न पुरस्कार जाहीर झाला. योग क्षेत्रात श्रीमती तांबे आपल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे जिल्ह्याभरात विख्यात आहेत. आजवर त्यांना सामाजिक योगदानाबद्दल विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले ही त्यांच्यासाठीच नव्हे तर बीड जिल्ह्यासाठी देखील गौरवाची बाब आहे. हा पुरस्कार प्राप्त झाल्याने त्यांनी पसायदान सेवा प्रकल्प (वंचितांचे हक्काचे घर) ढेकणमोह ता. जि.बीड या स्वयंसेवी संस्थेचे श्री.दराडे कुटुंब व श्रीमती विधाते ताई यांचे आभार मानले व पुढे देखील योगाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण आणि सशक्तीकरण करण्यात काही कसूर न ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.माता भगिनीने संघर्षावर मात करून परिस्थिती बदलली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

# यंदाच्या गर्दभ सावरीला स्थगिती!

## मस्साजोग प्रकरणामुळे ग्रामस्थांचा निर्णय

केज । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण मागील तीन महिन्यांपासून राज्यभर गाजत आहे. शेजारच्या गावात घडलेल्या दुःखद घटनेमुळे विडा (ता. केज) येथील ग्रामस्थांनी यंदा धुळवडीला जावयाची गाढवावरून मिरवणूक न काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे निजामकालीन परंपरेला कोरोनानंतर दुसऱ्यांदा खंड पडला आहे. गर्दभ सवारी निघणार नसल्याने जावईबापूंना दिलासा मिळाला आहे. विडा येथील निजामकालीन जहागीरदार ठाकूर आनंदराव देशमुख यांनी धूलिवंदनाच्या दिवशी सासुरवाडी असलेल्या विडा येथे आलेले त्यांचे जावई बाळानाथ चिंचोली (जि. १. लातूर) लातूर) यांची याची थट्टामस्करीतून थट्टामस्करी गाढवावर



बसून सवारी काढली होती. तेव्हापासून धूलिवंदनाच्या दिवशी जावई बापूंची गाढवावरून मिरवणूक काढण्याची परंपरा रूढ झाली.

विडा येथील जावई शोध समिती ही जावईबापूला पकडून आणते. धूलिवंदनाच्या दिवशी ग्रामपंचायतीसमोर चपलाचा हार घातलेल्या गाढवावर बसवून मिरवणुकीला सुरुवात केली जाते. रंगाची उधळण करीत वाजत-गाजत गावातील प्रमुख रस्त्यांवरून मिरवणूक काढली जाते. ग्रामदैवत राजा हनुमान मंदिरासमोर लोकवर्गणीतून जमलेल्या पैशांतून खरेदी केलेला कपड्यांचा आहेर जावईबापूला दिला जातो. सासऱ्याच्या ऐपतीप्रमाणे सोन्याची अंगठी भेट दिली जाते.

गावाची परंपरा मानून मिरवणुकीत कधीही भांडण तंटा, मान-अपमान असा प्रकार घडलेला नाही. सर्व जाती-धर्मीच्या जावयांना या गावकऱ्यांनी मिरवले आहे. गावकऱ्यांनी सामाजिक एकोपा व सलोखा जपला आहे. गावात सोयरीक झालेले दीडशेहून अधिक जावई आहेत. त्यापैकी ४० जावयांची विडेकरांनी मिरवणूक काढली आहे.

# पुजाताई मोरे अडकणार विवाहबंधनात

## येत्या २३ मार्चला अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत होणार विवाहसोहळा संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

राजकारणात आणि समाजकारणात महाराष्ट्रभर प्रसिद्ध असणाऱ्या तसेच रणरागिणी म्हणून ओळखली जाणारी पुजा मोरे या लवकरच लग्न बंधनात अडकणार आहेत. त्यांच्या लग्नाची तारीख काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. समाजकारण व राजकारणात सक्रिय राहून शेतकरी व महिलांवरील अन्याय, अत्याचाराविरोधात आवाज उठवणारी गेवराई तालुक्यातील क्रांतिकारी विचारांची भूमिकन्या कु. पूजाताई मोरे ह्या येत्या दि.२३ मार्च २०२५ वार रविवार रोजी लग्नबंधनात अडकणार आहेत. त्यांचा शुभविवाह डॉ. धनंजय जाधव यांच्याबरोबर रविवारी सायंकाळी ६:३० वाजता गीताताई लॉन्स, धानोरी-लोहगांव रोड, पुणे येथे अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थित संपन्न होणार आहे. गेवराई तालुक्यातील मिरगाव येथील मूळ रहिवासी व उच्चविद्याविभूषित असलेल्या कुमारी पूजाताई मोरे यांना शालेय जीवनापासूनच समाजकारण व राजकारणाची अवघड असल्याने शिवसेना नेते तथा माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या गटातर्फे



गेवराई तालुक्यातील तलवाडा गटातील अंतरवाली गणातून निवडणूक लढवून त्या पंचायत समिती सदस्य झाल्या. त्यानंतर नेतृत्व गुणामुळे त्यांना विविध पक्षातील पक्षातील मोठमोठ्या पदावर काम करण्याची संधी मिळाली. त्यांनी राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेत युवती प्रदेशाध्यक्ष आणि शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी समर्थपणे संभाळली शेतकरी व महिलांवरील अन्याय, अत्याचाराविरोधात त्यांनी रस्त्यावर उतरून केलेली आंदोलने राज्यात गाजली आहेत. यंदा छत्रपती संभाजी राजे यांच्या स्वराज्य पक्षाकडून त्यांनी पंडित- पवारांविरुद्ध गेवराई विधानसभेची निवडणूक लढवली होती.

# अखेर रोहन गलांडे यांच्या विविध मागण्या मान्य

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील विविध मागण्यासाठी रोहन गलांडे यांनी अमरण उपोषन धरले होते परंतु अमरण उपोषणाला बसण्या अगोदर काही मागण्या मान्य झाल्या व बसल्या नंतर काही मागण्या मान्य झाल्या व तसेच रोहन गलांडे यांनी सरपंच संतोष देशमुख यांचे मारहाणीचे वाद्रोही फोटो बाहेर येताच उपोषणाला स्थगिती दिली आहे तरी मागण्या मान्य झाल्या आहेत पुढील प्रमाणे मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत पहीली मागणी होती.

चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम सुरू करण्यात यावे याचे उत्तर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी पत्राद्वारे सांगितले आहे की, शासन निधी उपलब्ध करून काही महीन्यात काम सुरू करण्यात येईल तसेच दुसरी मागणी अशी होती काळेगाव घाट येथील जलजिवन कामाची चौकशी करण्यात यावी तर चौकशी झाली असता काळेगाव घाट येथील काम ३१ मार्च पर्यंत पुर्ण करु असा अहवाल जलजिवनचे अधिकारी यांनी दिला आहे तसेच तीसरी मागणी अशी होती की चिंचोली माळी नागबेट वस्ती ते नामदेव महाराज सभागृहात झालेल्या अतिक्रमण तात्काळ हटविण्यत यावे तरी पंचायत समिती केज यांनी



ग्रामपंचायत चिंचोली माळी यांना अतिक्रमण काढण्यासाठी कळवीले आहे तसेच चौथी मागणी अशी होती की केज पंचायत समितीच्या बीडीओ दीवाने मॅडम व ग्रामसेवक यांची बदली करण्यात यावी तरी बीड जिल्हा परिषदेचे सीईओ यांनी असे सांगितले आहे की येत्या पंधरा दिवसांत बदली करण्यात येईल अशा प्रकारे रोहन गलांडे पाटील यांच्या मागणीला यश आले तरी या मागण्या प्रत्येशात काम दीलेल्या कालावधी मध्ये झाले नाही तर उपोषणाला स्थगिती दिली आहे नंतर परत अमरण उपोषणाला बसणार असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी अजय गायसमुद्रे

धारूर । प्रतिनिधी



भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर १३४ वे सार्वजनीक जयंती उत्सव समिती चे कार्यकारणी निवडीसाठी बैठक होऊन अध्यक्षपदी एकमताने युवा कार्यकर्ते अजय उर्फ बबलु गायसमुद्रे यांची एकमताने निवड करण्यात आली व मोठ्या उत्साहात विवीध कार्यक्रम घेऊन जयंती साजरी करण्याचे ठरवण्यात आले.

धारूर येथे विर पांडूरंग चौक येथे माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव सिरसट, रिपईचे तालुकाध्यक्ष धोंडीराम सिरसट, माजी नगरसेवक चोखाराम गायसमुद्रे, रिपई नेते किशोर गायसमुद्रे, नगरसेवक संतोष बप्पा गायसमुद्रे, शंकर गुरुजी गायसमुद्रे, बाबासाहेब गायसमुद्रे, सुनिल सिरसट, बंडु आण्णा गायसमुद्रे, सुजित वैरागै, माणीक लोखंडे, जितेंद्र गायसमुद्रे आदीचे प्रमुख उपस्थीतीत व मार्गदर्शना खाली कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. यावर्षी धारूर शहरात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात व विवीध कार्यक्रम घेऊन उत्साहात साजरी करण्याचे ठरवण्यात आले. यावेळी सार्वजनिक उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली अध्यक्ष पदी अजय उर्फ बबलू गायसमुद्रे यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष संजय शिरसाट, बंटी गायसमुद्रे, करणं सिरसट, सचिव चंद्रकांत सिरसट सहसचिव अक्षय वैरागे, सल्लागार आकाश गायसमुद्रे, बादल सिरसट आदीची निवड करण्यात आली. या बैठकीला कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# साबला गाव पाणीदार करण्यासाठी एआरटी संस्था यवतमाळ यांनी घेतला पुढाकार

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील साबला गाव हे नेहमी कोणत्यान कोणत्या कारणाने चर्चेत असते. त्यात आतासाबला या गावात भर पडली ती म्हणजे पाणी टंचाईची बऱ्याच वर्षापासून या गावाला पाणी टंचाईचा सामना करावा लागतो. याची दखल ही जिल्हा यवतमाळयेथील एआरटी क्शन रुरल टॅक्नॉलॉजी संस्था यवतमाळ या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री.सुहासराव धस, जल संधारण तज्ञ पवनराव नखाते, प्रकल्प व्यवस्थापक वलीतांबोळी प्रकल्प सहाय्यक श्रीमती ज्योतीताई सांबरे यांनी पुढाकार घेऊन केज तालुक्यातील साबला हे गाव दत्तक घेतले आहे. आणि या गावाला टॅकर मुक्त करण्यासाठी या गावाची निवड केली आहे.

साबला या गावाच्या परिसरातील लहान ओढे, नाले, नद्या यातील गाळ काढून त्याचे रूंदीकरण करणे, त्यामध्ये पाणी अडवण्यासाठी बॉक्स बनवणे, पाऊस पडल्या नंतर पावसाचे पाणी जमिनीत मुरले पाहिजे म्हणजे यानंतरच्या पुढील काळात या गावातील नागरिकांना तसेच पशु, पक्षी, प्राणी यांनापाण्याची कसलीही अडचण येणार नाही. यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

या कामाचा शुभारंभ उप सरपंच श्रीमती कचराबाई सरवदे, समाजसेवक, आदर्श शिक्षक श्री.नरहरी काकडे, ग्रामपंचायत अधिकारी श्री.धनराज सोनवणे, चेअरमन उत्तम राव काकडे, माजी सरपंच मधुकर काकडे, माजी सरपंच महादेव कटारे, ग्रामरोजगार सेवक दत्तकुमार काकडे, ग्राम पंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ,पोपट काकडे, मेजर बबनराव मुळे, माजी ग्रामपंचायत सदस्य रामराजे शिंदे, श्रीमंत नाईकनवरे, आश्रुबा काकडे, सेवा सहकारी सोसायटी संचालक सदाशिव काकडे तसेच बाबुराव काझी, पवन सरवदे, जालींदर मुळे, अनिल भोसले, संजिवन नाईकनवरे, सुदामराव राऊत, रामभाऊ काकडे, गोरख काकडे, बप्पा काकडे, तात्याराम मुळे, विश्वनाथ नाईकनवरे, उत्तमभाऊ काकडे, राजेभाऊ काकडे, विलास काकडे, जगन्नाथ काकडे, सुभाषराव काकडे, गुलाब मुळे, राम काकडे, सावताराम नाईकनवरे, सुदामराव नाईकनवरे इत्यादी गावकऱ्यांच्या उपस्थितीत या कामाचा शुभारंभ करण्यात आला.



# नवनाथ आडे यांच्या एका फोनवर पाचोड पोलीस प्रशासन एकवटला

## गुन्हेगारी कमी करण्यासाठी व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पाचोड पोलीस प्रशासन सज्ज

गेवराई । प्रतिनिधी

पोलिस दल आणि पोलिस दलातील कर्मचारी बहुतेक करून त्यांचा संवेदनशील, कार्यतत्पर आणि समाजाभिमुख, चेहरा आहे. या पार्श्वभूमीवर नित्याच्या कर्तव्यापलीकडे जाऊन बांधिलकी जपणाऱ्या पाचोड पोलिस प्रशासनाच्या कर्तृत्वाचा वेध ठरत आहे. गेवराई तालुक्यातील राजपिंपरी शिवारातील वाघदारा तांडा येथील एका सामान्य व्यक्तीची तक्रार पत्रकार नवनाथ आडे यांच्याकडे प्राप्त झाली होती की, पाचोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाद झाला आहे. आणि आम्हाला पाचोड पोलीसांची गरज भासत आहे. तसेच तक्रारदाराच्या माहितीनुसार पत्रकार नवनाथ आडे यांनी संबंधित पाचोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना संपर्क करून माहिती दिली. एक फोन करताच सदरील तक्रारदाराला पाचोड पोलीस प्रशासनाकडून लागेल तशी मदत मिळाल्याने कौतुक होत आहे.




याबाबत सविस्तर माहिती अशी की, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाचोड पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील कडीठाण तांडा येथे तक्रार असलेले डिगांबर राठोड यांचे बुधवार दि.१२ रोजी संबंधित नातेवाईकांसोबत काही कारणास्तव वाद निर्माण झाला होता. तक्रारदार हा गेवराई तालुक्यातील रहिवासी असल्याने त्याला स्थानिकच्या लोकांकडून धनकावले जात होते. आणि विशेष म्हणजे संध्याकाळचा वेळ होता. तक्रारदाराने सदरील घडलेला प्रकाराची सबब माहिती पत्रकार नवनाथ आडे यांना दिली. माहिती मिळताच तात्काळ पत्रकार आडे यांनी संबंधित पाचोड पोलीस प्रशासनाला संपर्क करून घटनेची माहिती दिली. त्यांनी तातडीने शासकीय गाडी उपलब्ध करून सोबत तक्रार व एक पोलीस उपनिरीक्षक काही पोलीस कर्मचाऱ्यांसह गाडी घटनास्थळी पाठवली. त्याठिकाणी पोलिसांची गाडी दाखल होताच सदरील ठिकाणाहून आरोपी फरार झाला होता. पोलिसांनी तक्रारदाराला पोलीस ठाण्यात आणून तक्रारदाराची पाचोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

सातत्याने वाढत चाललेल्या गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पाचोड पोलीस प्रशासन सज्ज झाले असल्याचे दिसून आले. आरोपी मार्फत झालेल्या अन्यायाची भावना समजून घेत पत्रकार आणि पोलीस बांधवांचे सहकार्य लाभले.

# लोखंडी सावरगाव येथे भव्य मोतीबिंदू नेत्र शस्त्रक्रिया शिबिर

अंबाजोगाई । प्रतिनिधी



वृद्धत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र, लोखंडी सावरगाव येथे भव्य मोतीबिंदू नेत्र शस्त्रक्रिया शिबिर संपन्न दि.११/०३/२०२५ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य मोतीबिंदू नेत्र शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले. सदर शिबिरात एकुण ५८ रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. सुनिल जाधव यांनी शिबिराचे नियोजन केले.

शिबिरात नेत्रशल्य चिकित्सक डॉ. चंद्रकांत वाघ, डॉ. राधेश्याम जाजु, डॉ. रविंद्र गालफाडे, डॉ.प्रदीप सानप व डॉ.नारायण आळने यांनी शस्त्रक्रिया केल्या. सदर शिबिरासाठी मैथिली कुलकर्णी, महावीर मांडावे, संजय रामपुरकर, दिपक गायकवाड, ज्ञानेश्वर शेळके आणि सुमित कुलकर्णी यांनी नेत्र चिकित्सा अधिकारी म्हणून काम पाहिले. त्याचबरोबर शस्त्रक्रिया गृह आणि वार्ड मध्ये सहाय्यक अधीसेविका श्रीमती कौसर बानु शेख यांच्या अधिनस्त परीसेविका श्रीमती काशीबाई अंबाड आणि श्रीमती रजनी भालेराव तर अधिपरीचारिका श्रीमती लीला मस्के, निशा चिखले, अरुण फड आणि महादेव इंगळे यांनी व स्त्री रुग्णालय आणि वृदत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र येथील सर्व अधिपरीचारिका यांनी सहकार्य केले.

तसेच शिबिरात शस्त्रक्रिया सहाय्यक अमरदीप जोगदंड, विजय महाजन, ज्ञानेश्वर करपे, अक्षय मोहिते, शेख सत्तार, भागवत टाकसाळकर, शहीद शेख आणि ज्ञानेश्वर लाटे यांनी परिश्रम घेतले. तर शिबीर यशस्वितेसाठी डॉ. सुशील पवार, डॉ.बालासाहेब मेढे, डॉ. महादेव केंद्रे, डॉ. दिलीप गायकवाड, डॉ. वासंती चव्हाण डॉ. अनुराधा शिनगारे, डॉ. विमला इडगार आणि डॉ. संतोष कदम उपस्थित होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सर्व रुग्णांची भेट घेतली व सर्व अधिकारी कर्मचारी यांचे कौतुक करून आभार मानले.

# महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे; मोर्चाद्वारे राष्ट्रपतींकडे मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा आणि वंचित बहुजन आघाडी बीड जिल्हा पुर्व च्या वतीने उपविभागीय कार्यालयावर मोर्चा काढण्यात येवून महामहीम राष्ट्रपती भारत सरकार यांना निवेदन देण्यात आले. बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देऊन कायद्यात बदल करण्यात यावा.

सम्राट अशोक ह्यांनी इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात महाबोधी महाविहाराचे बांधकाम केले. तथागत बुद्धाला ज्या बोधीवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली तो बोधीवृक्ष याच महाबोधी महाविहार परिसरात आहे. त्यामुळे देशातील नव्हे, तर जगभरातील बौद्ध अनुयायी भिक्खू आणि पर्यटक या स्थळाला भेट देतात; मात्र या महाविहाराचे नियंत्रण आणि



व्यवस्थापन आजही बौद्धांच्या ताब्यात नाही. महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, यासाठी १९९२पासून आंदोलन होत आहेत. तरी सुद्धा महाबोधी विहार व्यवस्थापन कायदा बदलण्यात आला नाही. त्यामुळे पाच हिंदू धर्मीय ह्यांचे प्राबल्य असल्याने बौध्द गया येथील महाविहार येथे पंडे आणि ब्राम्हणवादी पुजा आणि कर्मकांड करीत असतात. त्यामुळे ज्या रूढी परंपरा ह्यांना तथागत गौतम बुद्ध ह्यांनी नाकारले तीच कर्मकांड येथे सुरू आहेत.

जागतिक वारसा म्हणून मान्यता प्राप्त बौध्द गया येथील महाविहार व्यवस्थापन कायदा तातडीने बदलण्यात यावा अशी आमची मागणी आहे. याकरीता सदर आंदोलन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू ड. प्रकाश आंबेडकर तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शन व आवाहनानुसार तसेच भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भिमराव आंबेडकर ह्यांचे पुढाकाराने तसेच समता सैनिक दल व विविध बौद्ध संघटना यांच्यावतीने दि.१२ मार्च बुधवार रोजी देशभरातील बौद्धांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भारतीय बौद्ध महासभा व वंचित बहुजन आघाडीच्यावतीने संयुक्तरित्या आंदोलन करीत आहोत.

महाबोधी महाविहार (बोधगया, बिहार) हे पवित्र बौद्ध धर्मस्थळ असून, बोधगया महाविहार कायदा १९४९ चा अन्यायकारक कायदा रद्द करावा. बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय बौद्धांना सोबत घेऊन बौद्धांच्या ताब्यात द्यावे. जागतिक वारसा अबाधित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात विशेष विकास निधी आणि सुविधा तात्काळ देण्यात याव्यात. आपला देश स्वातंत्र्य झाल्यावर २६ जानेवारी १९५० पासून घटना लागू झाली आहे. त्यावेळी भारतीय राज्यघटनेचे कलम १३ नुसार घटना लागू होण्यापूर्वी केलेले सर्व कायदे आणि नियम निरस्त केले आहेत. मात्र तरी देखील देशात १९४९ चा नियमबाह्य कायदा लावून बौध्द समूहाचे धार्मिक अधिकार काढून घेण्यात आले आहेत.

आपण देशाच्या प्रमुख आहात, याकरीता केंद्र सरकार आणि बिहार सरकारने आपले विशेष अधिकार वापरून १९४९ चा कायदा दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात यावा. म्हणून हे निवेदन दिले असून याच्या प्रतिलिपी आवश्यक त्या ठिकाणी पाठविण्यात आल्या आहेत.

### सुट्टीची सुचना

उद्या दि.१४ मार्च रोजी धुलिवंदन असल्यामुळे सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ कार्यालयास सुट्टी असल्याने दि.१४ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

व्यवस्थापक

### टीसी हरवला आहे

तेजस अंकुशराव घुमरे यांचा पाचवी पास चा टीसी बीड ते मांजरसुंबा प्रवास दरम्यान हरवलेला आहे सापडल्यास संपर्क करा.

तेजस अंकुशराव घुमरे

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचा समारोप मौजे कासारी येथे संपन्न

# निबंध, रांगोळी, भित्तीपत्रक स्पर्धेतील विजेत्यांचा झाला गौरव

केज । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचलित, बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक विशेष शिबिराचेआयोजन मौजे कासारी या.केज येथे दि.६ मार्च ते १२ मार्च २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. विशेष शिबिराचा समारोप दि.१२ मार्च २०२५ रोजी उत्साहात झाला. समारोपाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनिल किर्दंत हे होते.




अध्यक्षीय भाषणात त्यांनी युवकांच्या जबाबदारीवर भर देत असे मत व्यक्त केले की, आजचा युवा हा उद्याचा भारत आहे आणि त्याने डिजिटल साक्षर असणे ही काळाची गरज आहे. तंत्रज्ञानाच्या युगात तरुणांनी डिजिटल साधनांचा योग्य वापर करून समाजहितसाधावे. व्यासपीठावर क्रांतिवीर आत्माराम बापू पाटील माध्यमिक विद्यालय, कासारी या शाळेचे मुख्याध्यापक चोले व्हि.डी.डॉ.छत्रभुज इंगळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. इंगळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या या सामाजिक कार्याची प्रशंसा केली आणि विद्यार्थ्यांनी यातून समाजसेवेची प्रेरणाघ्यावी असे आवाहन केले. या शिबिरात स्वयंसेवकां साठी विविध समाजोपयोगी उपक्रम यामध्ये ग्रामस्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरे, डिजिटल साक्षरता कार्यशाळा, स्वच्छता जनजागृती रॅली आणि व्यक्तिमत्व विकास सत्रे यांचा समावेश होता.

स्वच्छता अभियानात चिंचपुर मारुती देवस्थानचा परिसर स्वच्छ केला. विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव मिळावा म्हणून भित्तीपत्रके, निबंध व रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.यादव जे.बी. यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.क्षीरसागर पी.बी. यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रसिद्धी विभागाचे डॉ.बी.जे.हिरवे यांनी केले. या विशेष शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. जे.बी.यादव, प्रा.डॉ.बोबडे ए.आर, डॉ.शाम सरसरे, डॉ.टी.एस.बिडवे, डॉ. सुधीर आगळे, डॉ.प्रमोद काळम, युवराज डोईफोडे यांनी विशेष मेहनत घेतली. महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी शिबिर यशस्वी केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती एकता नगरची कार्यकारणी जाहीर

बीड । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची १३४ वी जयंती विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून दरवर्षी सालाबादा प्रमाणे या ही वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती उत्साहात साजरी करण्यासाठी एकता नगर पेठ बीड येथील सर्व पक्षाचे



पदाधिकारी कार्यकर्ते महिला व नागरिकांच्या उपस्थितीत दी.०८ मार्च २०२५ शनिवार रोजी. सायंकाळी ठीक ८ वा. बैठक संपन्न होऊन पुढील कार्यकारणी घोषित करण्यात आली. अध्यक्षपदी नितीन सोनकांबळे तर सचिव पदी विशाल खळगे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष समाधान वरेकर सहसचिव नितीन वाघमारे कोषाध्यक्षअध्यक्ष सोनू साळुंखे यांची निवड करण्यात आली.

# केज येथे गायरानधारकांची महत्वपूर्ण बैठक होणार

केज । प्रतिनिधी



रविवार दिनांक १६ मार्च २०२५ रोजी शासकीय विश्राम ग्रह केज येथे ठीक सकाळी ११:३० वाजता विभागीय बैठकीचे आयोजन गायरान जमीन वाहिती धारक नागरिक तसेच सरकारी गायरान व गावठाण जमिनीवरील सन २०११ पासून अतिक्रमनीत घरकुल धारक नागरिक तसेच सन २००१ पासून सरकारी गायरान जमिनीवर पेरणी व कब्जा करून आपली उपजीविका करणारे अनुसूचित जाती, जमाती, भटक्या, विमुक्त जाती, जमाती पारधी, भिल्ल, वडार, कैकाडी, समाजातील सर्व वाहिती धारक नागरिक व गायराण हक्क, अधिकार यावर सतत संघर्ष, आंदोलण करणारे नेते, कार्यकर्ते, संघटना प्रमुख इत्यादी या बैठकीस आवर्जून उपस्थित राहणार आहेत.

केज तालुक्यातील व शहरातील सर्व गायरानधारकांनी आपल्या हक्कांसाठी या बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन केजचे सामाजिक कार्यकर्ते मा. बाबुरावजी गालफाडे सर तसेच राम शेंडगे, संदिपान हजारे, भाई मोहन गुंड, कपिल मस्के, प्रा. रमेश पाटोळे, सुनील हिरवे, बजरंग भाऊ ताटे, कडुदास कांबळे, धर्मराज मिसाळ, लालासाहेब लोंढे, राजेश जी घोडे, अशोकराव पालके, राष्ट्रपाल पडोळे, लक्ष्मण भाऊ जाधव, सय्यद शकील भाऊ, खंडू काळे, भीमराव हजारें इत्यादींनी केले आहे.

# लिंबागणेश येथे महाबोधी विहार मुक्तीसाठी निदर्शने

## महाबोधी बौद्ध विहार कायदा १९४९ रद्द करून बौद्ध विहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्ध भिक्खुंच्या ताब्यात द्यावे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी बौद्ध विहार कायदा बीटीएमसी अक्ट १९४९ रद्द करून महाबोधी बौद्ध विहाराचे संपूर्ण नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्ध भिक्खुंच्या ताब्यात देण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१३ गुरूवार रोजी सकाळी पंचशील नगर येथे तथागत गौतम बुद्ध आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून गावातील प्रमुख चौकातुन घोषणाबाजी करत रॅली काढण्यात आली. गावच्या मुख्य प्रवेशद्वारात निदर्शने करण्यात आली.

बिहार मधील महाबोधी बौद्ध विहार जागतिक वारसा स्थान म्हणून ओळखले जाते. शाक्य वंशाचे राजकुमार सिद्धार्थ गौतमांना या ठिकाणी पुर्णज्ञान (संबोधी /बुद्धत्व) प्राप्ती होऊन ते सम्यक संबुद्ध बनले व 'बुद्ध' म्हणून सर्वत्र ओळखले जाऊ लागले. तथागत गौतम बुद्धाला ज्या बोधी वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली. तो बोधीवृक्ष याच महाबोधी महाविहार परिसरात आहे. त्यामुळे देशातील नव्हे तर जगभरातील




बौद्ध अनुयायी भिक्खु आणि पर्यटक या स्थळाला भेट देतात. मात्र आजही या महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात नाही. तेथील बौद्ध विहाराचा ताबा सनातन ब्राह्मणांच्या ताब्यात असून ज्या रुढी परंपरांना गौतम बुद्धांनी नाकारले तीच कर्मकांडे येथे सुरू आहेत. बिहार येथील बौद्धगया महाबोधी महाविहार कायदा बीटीएमसी ॲक्ट १९४९ त्वरित रद्द करून सदरील बौद्ध विहार बौद्ध भिकूंच्या ताब्यात देण्यात यावे. बिहार राज्यात उपरोक्त कायद्याप्रमाणे बौद्धगया येथील महाबोधी महाविहार यांचे संपूर्ण व्यवस्थापन ब्राह्मण पुजाऱ्याकडे असून हा कायदा १९४९ मध्ये बिहार राज्य अंतर्गत स्थापित झालेला असून संविधानिक अधिकारानुसार (अनुच्छेद २५ आणि २६) प्रमाणे आणि संविधानाच्या अनुच्छेद १३ विरोधात आहे हा विरोधाभास संपुष्टात आणून संविधानाचे बुज राखून महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्ध भिकूंच्या ताब्यात देण्यात यावे. अशी मागणी करण्यात आली.

भिम टायगर ग्रुपचे बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, भिमराव जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, राजाभाऊ गिरे, बाळकृष्ण थोरात, सुरेश निर्मळ, श्रीहरी निर्मळ, अॅड. गणेश वाणी, दादा गायकवाड, बीड उपजिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पॅंथर सेना आरूण निर्मळ, जितेंद्र निर्मळ, उमेश थोरात, दादा थोरात, नितीन थोरात, श्रीकांत आवसरे, नितिन निर्मळ, नाना निर्मळ, सिद्धार्थ निर्मळ, अमोल वक्ते, तुकाराम गायकवाड, प्रमोद निर्मळ, बबन सोनावणे, भालचंद्र गिरे, गणपत तागड, सचिन गिरे, आदि सहभागी होते.




# नागरी सुविधा पुरविण्यास मुख्याधिकारी निता अंधारे सर्व स्तरात अपयशी

## अंधारे यांच्या भ्रष्ट कारभाराची खातेनिहाय चौकशी करून निलंबित करण्याची नगरसेवकांच्या शिष्टमंडळाची मागणी!






बीड । प्रतिनिधी
गेल्या चाळीस महिन्या पासून नगर परिषद बीड चा कारभार प्रशासनाच्या हाती असल्याने नगर परिषद बीड च्या मुख्याधिकारी निता अंधारे यांचा एककलमी हुकमशाही, अनागोंदी भ्रष्ट कारभार सुरु असून नगरपरिषदेमध्ये येणाऱ्या जेष्ठ कनिष्ठ नागरिकांसह त्यांचेकडे काही नागरी समस्या सांगण्यासाठी आलेल्या उभयतांना तसेच लोकप्रतिनिधी यांना अरेरावी व उद्धट भाषेत बोलून मनमानी, हुकमशाही,वर्तन करत असून कर्तव्यात कसूर करत आहेत. बीड शहरात जागोजागी कचऱ्याचे ढिगारे असून शहराच्या प्रत्येक भागात प्रचंड अस्वछता पसरली आहे. या अस्वच्छतेमुळे शहरात भयाण रोगराई निर्माण होत आहे. मुख्याधिकारी निता अंधारे या नागरी सुविधा पुरविण्या पेक्षा गुत्तेदारी करण्यात व्यस्त असून विविध योजनेखाली येणाऱ्या निधीचा गैरवापर करत आहेत.

विविध योजनेतील कामें त्यांच्या मर्जीतील गुत्तेदारास देऊन अर्थपूर्ण हेतू साध्य करत आहेत मुख्याधिकारी निता अंधारे यांचे विरोधात सर्वसामान्य नागरिकां सह, स्थानिक लोकप्रतिनिधी, स्थानिक वृतपत्र, आदींच्या अनेक तक्रारी आहेत परंतु मस्साजोग हत्याकांड प्रकरणातील मुख्य आरोपी असलेले वाल्मिक कराड यांचे राजकीय पाठबळ मुख्याधिकारी निता अंधारे यांना असल्याने त्यांचे विरुद्ध प्रशासकीय स्तरावर कसल्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही. मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या दोन वर्षाच्या कार्यकाळात पाणी पुरवठा, बांधकाम विभाग, विद्युत विभाग, सह इतर विभागात मोठा भ्रष्टाचार झाला आहे.
शहरात पथदिवे नसल्याने शहरातील काही भागात अंधार पसरला आहे तसेच काही भागात आठ दिवस तर काही भागात वीस दिवसाला पाणी पुरवठा करून शहरातील नागरिकांना मुख्याधिकारी निता अंधारे या वेठीस धरत आहेत तसेच कार्यालयीन वेळेत त्या सध्या त्यांचे शासकीय निवास्थानी अथवा अभियंता, किंवा गुत्तेदार यांच्या कार्यालयातून नगर परिषदेचा कारभार हाकत असल्याने शक्यतो त्या कार्यालयात उपस्थित नसल्याने कर्मचारी देखील कार्यालयात उपस्थित नसतात त्यामुळे कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.
एकंदरीत बीड शहरातील नागरिकांना नागरी सुविधा पुरविण्यास अपयशी ठरलेल्या मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या भ्रष्ट कारभाराची खातेनिहाय सखोल चौकशी करून निलंबित करण्यात यावे अशी मागणी जेष्ठ मा.नगरसेवक भिमराव वाघचौरे, नगरसेवक ॲड विकास जोगदंड, नगरसेविका सौ पुजा गणेश वाघमारे यांचे सह शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT